UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

**पुरवणी अंक २८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)**

- शके १९४५
- वर्ष : ९२
- पुरवणी अंक : २८

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ. सुनील हेळकर
- प्रो. डॉ. प्रेमचंद गायकवाड
- प्रा. डॉ. गोवर्धन दिकोंडा

*** प्रकाशक ***

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

२१. महाराजा सयाजीराव गायकवाड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुबंध

- डॉ.माधव केरबा वाघमारे ---------------------------------------------------------------- ८१

२२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक सुधारणा

- १) नरेंद्रकुमार भिमराव बोरसेपाटील, २) प्रा. डॉ. साहेबराव त्र्यंबकराव भुकन ---------- ८५

२३. लोककल्याणकारी राजे सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक योगदानः एक अध्ययन

- डॉ.नितीन रामदास बडगुजर ---------------------------------------------------------- ९०

२४. लोककल्याणकारी राजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्य व कर्तृत्वाचा अभ्यास

- प्र. प्राचार्य डॉ. महेश वाघ ---------------------------------------------------------- ९४

२५. सयाजीराव गायकवाड यांच्यावरील साकेत प्रकाशनाच्या ग्रंथांचा आढावा

- लीना नारायणराव पुप्पलवार -------------------------------------------------------- ९८

२६. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षण विषयक विचार एक ऐतिहासिक विश्लेषण

- १) प्रा.डॉ. कैलास जे. गायकवाड, २) प्रा. डॉ . नितीन उल्हासराव सराफ ------------- १०३

२७. महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड

- डॉ. प्रज्ञा कामडी ---------------------------------------------------------------- १०७

२८. सयाजीराव गायकवाड यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान

- डॉ. प्रा. वसंत निनावे ---------------------------------------------------------------- १११

२९. प्रज्ञावंत राजा महाराजा सयाजीराव गायकवाड : आकलन आणि अन्वयार्थ

- डॉ. शारदा कदम ---------------------------------------------------------------- ११४

३०. महाराज सयाजीराव गायकवाड यांचा स्त्रियांच्या सुधारणांविषयक दृष्टीकोन

- १) मंगला दामोदर महाजन, २) प्राचार्य. डॉ. सुभाष एस. गवई ------------------------ ११७

ISSN No. 2394-5990

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षण विषयक विचार एक ऐतिहासिक विश्लेषण

१) प्रा.डॉ. कैलास जे. गायकवाड
इतिहास विभाग प्रमुख
श्रीमती श. धाबेकर महाविद्यालय
कारंजा लाड जि. वाशीम
मो.क्र. ९८५०७१४१६१
Email: kailashjgaikwad@gmail.com

२) प्रा. डॉ . नितीन उल्हासराव सराफ
प्राध्यापक, इतिहास विभाग
श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय
अंजनगाव सुर्जी जि. अमरावती
मो.क्र.९७६५३५१११५
Email: nusaraf88@gmail.com

**महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे शिक्षण विषयक विचार एक ऐतिहासिक विश्लेषण :**

महाराजा सयाजीराव गायकवाड हे गुजरात मधील बडोदा या संस्थांचे राजे होते . तथापि आपले अधिकार व सत्ता यांचा वापर राज्यातील सामान्य जनतेच्या कल्याणासाठी करणारे जे काही मोजके संस्थानिक या देशात होते त्यापैकीच एक सयाजीराव गायकवाड होते .आपल्या संस्थानात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्यासाठी सयाजीराव गायकवाड सतत प्रयत्नशील राहिले.

सयाजीराव महाराजांच्या विचारानुसार शिक्षण या शब्दाचा अर्थ फक्त ज्ञानप्राप्ती एवढाच नाही , प्रथम जीवनाचे स्वरूप काय आहे ते ओळखण्यासाठी व जीवनाचा अर्थ लावायला शिकण्यासाठी, आपल्या स्वभावाला व आचाराला वळण कसे लावायचे आणि आपण साठवलेल्या जगात कसे वापरायचे उपयोगात आणायचे म्हणजे शिक्षण होय. शिक्षणामध्ये सर्वांना समान संधी व शिक्षणाचा स्वतःच्या जीवनासाठी व राष्ट्रासाठी उपयोग करणे खूप महत्त्वाचे आहे परकीय राष्ट्र शिक्षणाच्या बळावरच पुढालेले आहे त्यामुळे आपल्या देशातही शिक्षणाशिवाय विकास नाही. ब्रिटिशांच्या साम्राज्याच्या अंतर्गत जवळपास भारतातील ५६५ संस्थान होते सर्व संस्थानांमध्ये वेगवेगळ्याराज्य व्यवस्था कार्य करीत होती . या सर्व संस्थानांपैकी मोजक्याच राज्यकर्त्यांनी शिक्षण व्यवस्थेचे लक्ष दिले .या राज्यकर्त्यांमध्ये बडोदा संस्थांचे महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते . समाज सुधारण्याचे बाबतीत सुधारकांना राजाश्रय देतानाच महाराजांनी स्वतः आपल्या बडोदा संस्थानामध्ये शैक्षणिक कार्याचा प्रमुख ठसा उमटविला . विशेषतः बहुजन समाज व मागासलेले वर्ग यांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्यास त्यांनी प्राधान्य दिले . त्याकरिता इसवी सन १८९३ मध्ये त्यांनी बडोदा संस्थानात सक्तीच्या प्राथमिक शिक्षण योजनेची सुरुवात केली आणि क्रमाक्रमाने या योजनेची व्याप्ती वाढवीत नेऊन इसवी सन १९०६ मध्ये संपूर्ण संस्थानात ती अमलात आणली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारे बडोदा ही संस्था भारतातील पहिले राज्य होईल या एकाच गोष्टीवरून सयाजीराव महाराजांच्या कार्याचे महत्त्व व त्यांचे द्रष्ट्यपण स्पष्ट होते. स्त्री शिक्षण व अस्पृश्य समाजाच्या शिक्षणाकडे सयाजीराव महाराजांनी विशेष लक्ष दिले आणि त्यासाठी स्वतंत्र सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या शिक्षण व्यवस्थेमध्ये संपूर्ण भारतामध्ये अशा प्रकारच्या सुविधा देणारे बडोदा संस्थान महत्त्वपूर्ण होते . शिक्षणाचे महत्त्व जाणून स्वतः उच्च शिक्षण घेऊन जनतेला सुद्धा शिक्षण दिल्या गेले पाहिजे ही कास धरणारे व गावागावात ग्रंथालय निर्माण करून शिक्षणाची गंगा घरापर्यंत पोहोचवणारे म्हणून सयाजीराव गायकवाड यांची ओळख आहे.

सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या साम्राज्यामध्ये शिक्षण व्यवस्था रुजवण्यासाठी पुढील प्रमाणे कार्य केले.

**सक्तीचे प्राथमिक शिक्षण :**

शिक्षण जोपर्यंत सक्तीचे आणि मोफत केल्या जात नाही तोपर्यंत शिक्षणाचा विकास होणार नाही. शिक्षण व्यवस्था माहिती नसलेल्या समाजाला सक्तीचे शिक्षण देणे गरजेचे होते, त्याशिवाय समाज जागृती होणार नाही म्हणूनच सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या साम्राज्यामध्ये सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यासाठी कायद्याने मंजुरात दिली.[१] इसवी सन १८९२ मध्ये अमरेली तालुक्यातील नऊ गावात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याबद्दलचा कायदा लागू केला.[२] त्याकरिता महाराजांनी ३१ हजार ७९० रुपये मंजूर केले. ९ गावात सुरू झालेल्या या सक्तीच्या व मोफत शिक्षणाची भरभराट १९०६ पर्यंत संपूर्ण बडोदा संस्थान मध्ये अमलात आली. १९०६ पासून आठ ते बारा वर्ष वयाच्या मुलींचा मुलींना व आठ ते चौदा वर्ष मुलांना

राज्यभर सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याचा कायदा केला गेला.[३] पुढे १९०७ मध्ये रात्री शिक्षण घेण्याच्या वयाच्या अटींमध्ये बदल करून मुलाचे वय सहा वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्याला बारा वर्षे पूर्ण होईपर्यंत चौथीची शिक्षण द्यावे व पंधरा वर्षे पूर्ण होईपर्यंत पाचवीची शिक्षण द्यावे असा नियमच केला शिक्षण देत असताना धर्माचा व जातीचा कुठलाच भेदभाव केला जात नव्हता हे विशेष होते.

**स्त्री शिक्षण :**

सक्तीच्या शिक्षणामध्ये मुलींचा सहभाग होता . मात्र तरीसुद्धा स्त्री शिक्षणाच्या अंमल गजवण्यासाठी राज्यकारभार हातात घेतल्याबरोबर सयाजीराव महाराजांनी २० ऑगस्ट १८८५ स्त्री शिक्षणासाठी हुकुम काढून त्यामध्ये महाराज लिहितात, भावी पिढीच्या सर्वतोपरी संवर्धनाची जबाबदारी स्त्रियांवरच आहे स्त्रिया सुविधा असल्या तरच त्या उत्तम नागरिक निर्माण करू शकतील, निरक्षर निरबुद्ध स्त्रियांमुळे संसार निरस होण्याचा संभव असतो. गृहिणी शिकलेली आणि संस्कृत असली तर ती पुरुषाना चांगल्या प्रकारे मदत करू शकते, पुरुषांची सहकार्य करून त्यांच्याशी असलेले सहकारी नीचे नाते यथार्थ करून दाखविणे हाच विवाहाचा श्रेष्ठ हेतू मानला जातो. हे सर्व साधण्यासाठी स्त्रियांना योग्य शिक्षण देणे हा एकमेव मार्ग आहे.[४] या विचारांवरून समाजाच्या उद्धारासाठी किती महत्त्वाचे आहे हे दिसून येते आणि यासाठी सयाजीराव महाराजांनी व्हरनॅक्यूलर एज्युकेशन क्ट १९१३ प्रमाणेच स्त्री शिक्षणाच्या संदर्भात काही महत्त्वाचे कायदे केले या कायद्यामध्ये स्त्रियांसाठी खास शारीरिक शिक्षकांची विशेष नियुक्ती करून विद्यार्थ्यांनी कडून व्यायाम खेळ व कसरत करून घेण्यात येत होती. स्त्रियांच्या आरोग्य शिक्षणासाठी आरोग्य विषयक शिक्षण दिल्या जात होते. शाळेच्या अभ्यासा व्यतिरिक्त मुलींना भरतकाम, शिवणकाम आणि विणकाम करायचे शिक्षण सुद्धा शाळेमध्ये देण्याची व्यवस्था करण्यात आलेली होती. सोबतच पाकशास्त्र, गरबा, पाठ चिकित्सा अशा वेगवेगळे विषय घेऊन मुलींना शिक्षण दिल्या जात होते. हे सर्व शिक्षण मोफत आणि सक्तीचे होते.

ज्या ठिकाणी मुलींसाठी स्वतंत्र शाळा नव्हत्या अशा ठिकाणी स्त्री शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करताना मिश्र शिक्षणाचा प्रयोगही बडोदा संस्थांमध्ये करण्यात आला आणि तो यशस्वी झाला. दहा वर्षांवरील मुलींना शाळेकडे अधिकाधिक येण्यासाठी प्रलोभन म्हणून शिष्यवृत्ती देण्याची योजना ही चालू करण्यात आली होती आणि राज्याच्या अनेक भागात ही यशस्वी ही ठरली.

महाराजा सयाजीराव यांचा स्त्री शिक्षण विषयक दृष्टिकोन अतिशय व्यापक तसेच आधुनिक होता. स्त्रियांची आंतरिक शक्ती आणि समाज सुधारणेतील त्यांच्या योगदानाची क्षमता यावर महाराजांचा अति विश्वास होता. स्त्रियांमध्ये असणाऱ्या अनेक सूक्त गुणांची वाढ करून त्यांच्या उपयोग देशाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकासासाठी करण्याची आवश्यकता आहे याविषयी ते जागरूक होते. स्त्री शिक्षणाचा अंगीकार करताना त्याचबरोबर आधुनिक मूल्यांचा स्वीकार करताना, केवळ आजच्या त्यांच्या दृष्टिकोन असता कामा नये तर त्याला भारतीय जीवन शैलीच्या संदर्भात आकारात आणले पाहिजे हा त्यांच्या दृष्टीकोन त्यांच्या विचारातून आणि कार्यातून आपला दिसून येतो.

**पडदानाशीन स्त्रियांना व मुस्लिम स्त्रियांचे शिक्षण :**

ज्या मुली व स्त्रिया सर्वसामान्य शाळांमध्ये सामाजिक व धार्मिक बंधनांमुळे येऊ शकत नव्हते मात्र त्यांना शिक्षणाचे आवड होती अशा पडदानसीन असलेल्या स्त्रियांसाठी ठीक ठिकाणी झनाना वर्ग काढण्यात आले. या वर्गांमध्ये वयाचे कुठलेही बंधन नव्हते चाळीस वर्षाच्या वरील स्त्रियांनी सुद्धा या वर्गामध्ये प्रवेश घेतला होता. जीवन जगताना उपयोगी पडणारे विविध क्षेत्राशी संबंधित वेगवेगळे शिक्षण या वर्गांमध्ये दिल्या जात होते.[५]

मुस्लिम समाजातील स्त्री शिक्षणासाठी असलेली उदासीनता लक्षात घेऊन महाराज सयाजीरावांनी मुस्लिम मुलींसाठी अनेक उर्दू शाळा स्थापन केल्या. १८९२-९३मधील अमरेली तालुक्यात दोन उर्दू शाळा उघडण्यात आले उत्तरोत्तर ही संख्या २८ पर्यंत वाढली होती व मुलींची संख्या २८०० पर्यंत पोहोचली होती. यावरून सयाजीराव गायकवाड यांनी समाजातील प्रत्येक स्तरांवर जाऊन शिक्षणाची गंगा प्रत्येकापर्यंत पोहोचवण्याचे काम केले.

**मुलींसाठी निवासी शाळा :**

इ.स . १८९७ - ९८ मध्ये सोनगड मधल्या धानका येथे मुलींसाठी निवासी शाळा सुरू करण्यात आली. ही शाळा इयत्ता सातवी पर्यंत होती. खास करून समाजातील मागासलेल्या जाती व जमातीतील स्त्रियांच्या शिक्षणाकडे सयाजीराव महाराजांनी विशेष लक्ष दिले होते. त्यामुळेच त्या शाळेची निर्मिती केलेली होती. निवासी शाळेमध्ये नियमित शिक्षणा व्यतिरिक्त रेशमाचे उत्पादन करणे, रेशीम धागा तयार करणे तसेच लेस बनविण्याचे प्रशिक्षण या निवासी शाळेमधून मुलींना दिले जात होते.[६] निवासी शिक्षणात मुलीना अशी शिक्षनाची सुविधा देणारे बडोदा राज्य होते.

**अंत्यजांसाठी शिक्षण :**

शिक्षण हे सर्वांसाठी समान असले पाहिजे या विचाराचे सयाजीराव महाराज होते. त्यामुळे विद्या एकाच व्यक्तीला वर्गाला

किंवा समाजाला मिळून फायदा नाही, ती सार्वत्रिक असली पाहिजेत या भूमिकेतून त्यांनी बडोदे संस्थांना आदिवासी व उपस्थित घटकांसाठी विद्यालये काढले. सामाजिक रूढी आणि परंपरेतून घडलेली सामाजिक मानसिकता हा अंत्यजनांच्या शिक्षण प्रसारणातला मोठा अडसर असल्याचे सूक्ष्म निरीक्षण महाराजांनी आपल्या भाषणातून नोंदविले आहे. यासंबंधी त्यांना आलेला अनुभव कथन करताना महाराज म्हणाले होते की 'अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या वर्गावरील शिक्षकांचे काम करणे ज्यांना रुचत नाही अशी पुष्कळ हिंदू लोक आजही आहेत त्यामुळे मला अस्पृश्यांच्या शाळांसाठी ख्रिश्चन व मुसलमान शिक्षकांची मदत बाहेरून मागवावी लागते' वास्तविक शिक्षणात स्पष्ट अस्पृश्य असा भाव असण्याचे कारण नाही.

श्रमोपजीवी लोक शिक्षणाविषयी उदासीन असतात त्यामुळे अशा श्रमजीवी लोकांना शिक्षणाचे महत्त्व तसेच शिक्षणातून अर्थप्राप्ती या गोष्टींचे महाराजांनी विशेष लक्ष दिले. बडोद्याला अंत्यजनांच्या मुलांसाठी निवासी वस्तीगृह काढले. सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा कायदा केल्यानंतर अंत्यजनांच्या शाळांची संख्या २७ पर्यंत आणि विद्यार्थी संख्या ९२६९ पर्यंत वाढली होती.[७] १९०७ - १९०८ साली श्री. पंडित आत्माराम यांची बडोदे राज्यातील अंतर शिक्षणाचे इन्स्पेक्टर म्हणून स्वतंत्र नियुक्ती करण्यात आली. दवाखाने, ग्रंथालय, कोर्ट, सरकारी प्रचारातून पुरुषांना सरळ प्रवेश देण्यात आला. राज्यकारभार सुशिक्षित आणि त्यांचे तरुणांना थेट संधी देण्याची भूमिका होती. एका बक्षीस समारंभात बोलताना ते म्हणाले होते ङ्गमाझा असा विचार आहे की राज्यकारभाराला लायक असे एक दोन अंत्यजन विद्यार्थी उच्च अभ्यासासाठी विलायतेला पाठवावे मात्र त्यांनी परत आल्यावर या अंत्योदधारासाठी काम केले पाहिजे, अशी जबाबदारी घेण्यास तयार असतील त्यांना मी दिलाय त्याला अवश्य पाठवीन. (बडोदे , २९ जानेवारी १९२७ रोजीचे भाषण)

**अभ्यासक्रमात शारीरिक शिक्षणाचे महत्त्व :**

सयाजीराव महाराजांनी शिक्षण व्यवस्थेत बदल करताना आणि शिक्षण व्यवस्था आपल्या राज्यामध्ये प्रस्थापित करताना दुसऱ्या देशात चालणाऱ्या शिक्षण पद्धतीचा सखोल अभ्यास केलेला होता. त्यामुळे ग्रीस, रोमिया प्राचीन राष्ट्रांनी शरीर संवर्धनाकडे आणि क्रीडा प्रवृत्तीकडे विशेष लक्ष दिले होते. ऑलिंपिक खेळाची परंपरा त्या राष्ट्रांनी खेळायला दिलेले प्रतिष्ठेचे धोतक होते. महाराजांनी पौर्वात्य आणि पाश्चिमात्य जगातील खेळाच्या या महत्त्वपूर्ण भूमिकेमुळे शारीरिक शिक्षणाचे महत्त्व जाणले होते . खेळांमुळे व्यक्ती महत्त्वाची निकोप घडण व्हायला बळ प्राप्त होते, मुलांची खोड्या करण्याचे प्रवृत्ती खेळामुळे मावळते. चार चौघात मिळून मिसळून वागण्याची कला प्राप्त होते, चार चौघांना हाती घेऊन सामूहिक शेतीने काम पार पाडण्याचे गुण अंगवळणी पडतात. त्यामुळेच नियमित शिक्षणाबरोबरच खेळ आणि शारीरिक शिक्षण महत्त्वाचे आहे असे महाराजांनी स्पष्ट केले व आपल्या शिक्षण व्यवस्थेत शारीरिक शिक्षणाला महत्त्व प्राप्त करून दिले.

**औद्योगिक शिक्षणावर भर :**

सयाजीराव महाराजांनी पाश्चिमात्य देशांमध्ये ज्यावेळेस भेटी दिल्या, त्यावेळेस यांत्रिक विभागाशी तेथील संस्कृती कश्या विकसित झालेल्या आहेत तसेच शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे बरेच राष्ट्र विकसित झालेले आहेत. त्यामुळे आपल्या देशातील शिक्षणामध्ये सुद्धा औद्योगिक शिक्षणाचा समावेश असला पाहिजे, जेणेकरून ग्रामीण भागातील उद्योगांना चालना मिळेल आणि मनुष्यबळाचा पुरेपूर वापर करता येईल. यासाठी औद्योगिक शिक्षण महत्त्वाचे आहे. याच विचारातून १८८८ मध्ये महाराजांनी राज्याच्या औद्योगिक व ग्रामीण उद्योगांसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी एक अधिकारी नियुक्त केला, त्याच्या शिफारशीनुसार बडोद्यात इ.स . १८९० मध्ये 'कलाभवन' स्थापन करण्यात आले रंगकाम, विणकाम, सुतारकाम, मेकॅनिकल इंजिनिअरिंग इतर औद्योगिक शिक्षण देण्यासाठी ही शिक्षण संस्था उभी करण्यात आली. पारंपारिक पुस्तके शिक्षणाच्या जोडीला पुरवणी म्हणून हस्त कौशल्याची शिक्षण देण्याची व्यवस्था निर्माण करण्यात आले. अर्वाचीन उद्योगधंद्यांची ज्ञान मिळवण्याकरिता विद्यार्थ्यांना परदेशी पाठवण्याची योजनाही कार्यान्वित करण्यात आली. शिक्षणामध्ये रोजगाराभिमुखता निर्माण करणारे आणि औद्योगिक शिक्षण देणारे बडोदे संस्थान आधुनिक काळातील प्रथम संस्था होते असे दिसून येते. मुळात आधुनिक शिक्षणाचा पायाच सयाजीराव महाराजांनी घातल्याची दिसून येते.

**ग्रंथालय चळवळ :**

मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाबरोबरच समाजातला जिवंतपणा ग्रंथालया सारख्या संस्थांमुळे टिकून राहतो. या जाणिवेतून महाराजांनी सार्वजनिक ग्रंथालयाची चळवळ चालवली होती. पुस्तके नसतील तर समाज मृतवत होऊन पडेल असा इशाराच महाराजांनी एका भाषणात दिला आहे. पुस्तकालय ही समाजाच्या जिवंतपणाची खुण असल्याचे त्यांनी म्हटले होते. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी उत्तम उत्तम ग्रंथाची निर्मिती झाली पाहिजे व त्यासाठी तसेच धोरणही सरकारने राबवले पाहिजे. महाराजांनी ग्रंथालयाचा जनपद विश्वविद्यालय अशा शब्दात गौरव केला आहे.[८] ग्रंथालय नामक

विश्वविद्यालयात अभ्यास म्हणून प्रत्येक प्रजाजनाने दाखल झाले पाहिजे, असे जाहीर आव्हान ते आपल्या भाषणातून करत, पुस्तक संग्रहालयातून मागील पिढ्यांच्या ज्ञानाचा साठा उपलब्ध असतो, पुढील पिढ्यांचे भविष्य घडविण्याच्या कामात हा मागील पिढीचा वारसा कामाला येत असतो. पुढची पिढी मागच्या पिढीच्या कामगिरीच्या पायावरच आपले नवे विश्वकार्य उभारत असते. त्यामुळे ग्रंथालय ही निरंतर ज्ञान साधनेची माध्यमे आहे अशी महाराजांची श्रद्धा होती .

**उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती :**

आपल्या संस्थानांमध्ये मोफत आणि सक्तीचे शिक्षण तसेच निवासी शिक्षणाची सोय महाराजांनी केलेलीच होती. मात्र आपल्या देशात मिळणारे शिक्षण हे विद्यार्थ्यांना पुरेसे नाही याची जाणीव महाराजांना होती. त्यामुळे विदेशात जाऊन वेगवेगळे नाविन्यपूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांनी घ्यावे व या विद्यार्थ्यांनी घेतलेल्या शिक्षणाचा फायदा आपल्या देशासाठी करावा. या विचाराने परदेशामध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना सयाजीराव महाराजांनी आपल्या साम्राज्यांमध्ये निर्माण केली. ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती घेऊन विदेशात शिक्षण घेतले त्यांना काही काळ बडोदा संस्थांमध्ये सेवा द्यावी असे बंधन होते. सयाजीराव महाराजांचे चरित्रकार श्री माननीय दाते असे म्हणतात डॉक्टर भीमराव आंबेडकर यांचे शिक्षण महाराजांनीच केले आहे. सयाजीराव महाराजांनी उच्च शिक्षणासाठी अनेकांना शिष्यवृत्ती दिल्या यामुळे शिष्यवृत्ती घेऊन शिकलेल्यांना आपल्या समाज बांधवांसाठी कार्यकरता आले.

**शिक्षणावरील खर्च :**

सयाजीराव महाराजांनी सत्ता हातात आल्याबरोबर सर्वप्रथम शिक्षणावर खर्च करण्यास सुरुवात केली. शिक्षणाचे महत्त्व ते जाणून होते त्यांच्या स्वतःमध्ये शिक्षणामुळे झालेले परिवर्तन आणि त्यामुळे जनते प्रती निर्माण झाली संवेदना यामुळे राज्यकारभार धारण करण्यापूर्वी म्हणजेच G १८७९ - १९८० या वर्षांमध्ये विद्या खात्याचा खर्च रुपये दोन लक्ष १४ हजार १५४ झाला तर राज्यकारभार स्वीकारल्यानंतर त्यामध्ये वाढ करून चार लक्ष ३४ हजार ३४७ ही एकाच वर्षात केलेली वाढ होती. म्हणजे राज्य कारभार मिळतात हा खर्च एकदम दुप्पट वाढवण्यात आला, त्यानंतर ही वाढ सतत सुरू होती. तर १९०८-०९ मध्ये शिक्षणावर बारा लक्ष ८४ हजार ९११ रुपये खर्च झाल्याची नोंद आहे.[१] शिक्षणावरील खर्चाच्या रकमेवरून सहज समजते की महाराज शिक्षणाबाबत अत्यंत जागृत व दक्ष होते शिक्षणात बडोदा संस्थानाने प्रत्येक स्तरावरील केलेली प्रगती अधोरेखित करणारी आहे. जागतिक पातळीवरील शिक्षण प्राथमिक पासून तर उच्च शिक्षणापर्यंत देण्याचे कार्य संस्थानांमध्ये महाराजांनी केले, काळानुसार शिक्षणात अमुलाग्र बदल झाले पाहिजेत असे मत ते प्रत्येक वेळी व्यक्त करीत असत.

**संदर्भ :**


१. Report on the Public Istruction in the Baroda State . Part 4th

२. वरखेडे रमेश, संपादक, महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषासंग्रह, खंड १, प्रकाशन समिती, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २०१७,

३. उपरोक्त

४. बोर्डे डॉ. सुनिता,महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या स्त्रीसुधारणा, प्रकाशन समिती, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २०१७, खंड २५

५. उपरोक्त

६. वरखेडे रमेश , संपादक ,महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषासंग्रह, खंड १, प्रकाशन समिती, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २०१७,

७. उपरोक्त

८. बुवा डॉ . जी . ए . महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या सुधारणा, ग्रंथालय, प्रकाशन समिती, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन , २०१७, खंड २५

९. मालकर यमाजी, संपादक, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्रसंग्रह, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ


■■■